# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण


४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी. : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.


जा.क्र.मजीप्रा/सस/१०९८/सभा-८०/आ-४/ /

दिनांक : १६/७/१९९८.

विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८० व्या सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक ३/६/१९९८ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८० व्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

सोबत : ८० व्या सभेचे इतिवृत्त.

जे. एस. साहनी
(जे.एस्.साहनी)
सदस्य सचिव(प्रशासन)

सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ)

अपर मुख्य सचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.

मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता
तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष.

## दिनांक ३/६/१९९८ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८० व्या बैठकीचे इतिवृत्त:-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ८० वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष मा.अण्णासाहेब डांगे यांच्या अध्यक्षतेखाली दि.३/६/१९९८ रोजी झाली. या बैठकीस खालील सदस्य व निमंत्रित अुपस्थित होते :-

१) मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष
२) मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अुपाध्यक्ष.
३) श्री.व्ही.रंगनाथन, अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व सदस्य
४) श्री.भानुदास पडळकर, सदस्य
५) श्री.देवेंद्र फडणवीस,सदस्य
६) श्री.आशिष कुलकर्णी, सदस्य
७) श्री.माधव कुलकर्णी, सदस्य
८) श्री.आदिनाथ नवलेपाटील, सदस्य
९) श्री.राजेंद्र सिंग,प्रधान सचिव, वित्त विभाग,
१०) श्री. नंदलाल,प्रधान सचिव(२),नगर विकास विभाग
११) श्री.राजेंद्र सगणे,सदस्य सचिव(तांत्रिक),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१२) श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी ''विशेष निमंत्रित'' म्हणून उपस्थित होते :-

१) श्री.नि.कृ.मांडा,मुख्य प्रशासकीय अधिकारी
२) श्री.भा.आ.डोंगरे,वितीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी
३) श्री.एस.डी.अरमाळ,मुख्य अभियंता, ठाणे
४) श्री.एस.व्ही.शेळकीकर, मुख्य अभियंता,पुणे
५) श्री.अेस्.के.पाटील,मुख्य अभियंता,नाशिक
६) श्री.अ.ना.अळवणी,मुख्य अभियंता(बाहय अर्थसहाय्य)
७) श्री.अेन.आर.पवनीकर,अधीक्षक अभियंता,(यांत्रिकी)
८) श्री.मिलिंद केळकर,अधीक्षक अभियंता(समन्वय)
९) श्री.पी.के.सोनाग्रा,अधीक्षक अभियंता(मुख्यालय)

सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) हे प्रशिक्षणासाठी विदेश दौ-यावर गेले असल्यामुळे ते या सभेस अुपस्थित नव्हते. त्याचप्रमाणे अितर अनुपस्थित सदस्यांनी ते अनुपस्थित राहणार असल्याची कल्पना प्राधिकरणास दिली होती.

### कार्यक्रम बाब क्र.१ :-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ७९ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे

या विषयावर चर्चा करताना बहुतांश सदस्यांनी असे प्रतिपादन केले की, सदरच्या इतिवृत्त त्यांना पुरेसे आधी न मिळाल्यामुळे ते सविस्तरपणे वाचता आले नाही. तरी देखील सदर इतिवृत्तास मान्यता देण्यात यावी असा ठराव करण्यात आला. फक्त त्यानंतर काही सदस्यांकडून इतिवृत्तातील काही मुद्यांवर विचारणा करण्यात आली , तर त्याबाबतचा खुलासा प्राधिकरणाने करावा असे ठरले.

७९ व्या सभेच्या इतिवृत्तामध्ये पाणी पुरवठा योजनांसाठी कोणकोणत्या प्रकारचे पाअिप्स् कोणकोणत्या कामांसाठी वापरावेत याबाबत अेका तज्ञ समितीची नेमणूक करण्यात आल्याचे व सदर समितीचे काम चालू झाले असल्याचा अुल्लेख आहे. या अनुषंगाने असा मुद्या मांडण्यात आला की, सदर समितीचे कामकाज जास्त काळ चालू राहिले तर महत्वाचा बराच काळ वाया जाअील आणि त्या काळात ज्या योजनांच्या कामाच्या निविदा स्वीकारण्यात येतील त्यामध्ये समितीची शिफारशीनुसार पाअिप्स्चा वापर केला जाणार नाही. म्हणून सदर समितीस लवकरात-लवकर मध्यावधीत अहवाल सादर करण्याबाबत विनंती करण्यात यावी, जेणेकरुन तज्ञ समितीच्या काही शिफारशींचा लाभ तरी घेता येणे शक्य होअील.

[illegible] असा मुद्दा मांडण्यात आला की, ज्या ठिकाणी अे.सी.पाअिप्स् वापरले आहेत अशा योजनांच्या [illegible] तक्रारी येतात आणि त्यामुळे अे.सी. पाअिप्सचा वापर प्राधिकरणाने कोणत्याही योजनांवर करु नये. [illegible] श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य यांनी असे सांगितले की, पाश्चिमात्य देशात अे.सी.पाअिप्स्चा वापर पूर्णपणे बंद [illegible] असून, त्या जागी सी.आय. / डी.आय./ अेच.डी.पी.अी. /अेम.डी.पी.अी. /जी.आर.पी./ पी.व्ही.सी. असे [illegible] प्रकारचे पाअिप्स वापरले जातात. यावर सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी असे सुचविले की, जर अे.सी. पाअिप्सचा वापर अजिबात करु नये अशी शिफारस या कामी नेमण्यात आलेल्या समितीने केली आणि त्या शिफारशीवर प्राधिकरणाने शिक्कामोर्तब केले तर त्याबाबतचा विचार करणे शक्य होअील . याबाबत चर्चा करताना अशी विचारणा करण्यात आली की, प्राधिकरणामध्ये कोणत्या प्रकारचे पाअिप्स , कोणत्या कामांसाठी सध्या वापरले जावेत यासाठी काही सूचना / परिपत्रक मध्यवर्ती स्तरावर निर्गमित करण्यात आले आहे काय? यावर सदस्य सचिव(तां) यांनी अशा प्रकारचे तांत्रिक परिपत्रक दि. ३/६/९७ रोजी निर्गमित केले आहे असे सांगितले व सदस्य सचिवांनी या परिपत्रकातील काही महत्वाच्या तरतूदी सर्व सदस्यांना वाचून दाखविल्या. अशा प्रकारचे परिपत्रक काढले गेल्याचे सदस्यांना ज्ञात नसल्यामुळे हा मुद्दा अुपस्थित झाल्याचे पाहून असे सुचविण्यात आले की, यापुढे तांत्रिक पत्रकाच्या प्रती प्राधिकरणाच्या सदस्यांना पाठविण्यात याव्यात.

याच अनुषंगाने प्राधिकरणाच्या वेगवेगळया वृत्तपत्रात प्रसिध्द होणा-या निविदा सूचनांच्या प्रती आधी ठरविल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांना पाठविण्यात येत असल्याचे सदस्य सचिवांनी सांगितले असता, सचिव,नगर विकास विभाग तसेच प्रधान सचिव,वित्त विभाग यांनी असे सांगितले की, अशा प्रकारच्या सूचना आधी जरी देण्यात आल्या असल्या तरी, निविदा सूचनांच्या प्रती फक्त अशासकीय सदस्यांना यापुढे पाठविण्यात याव्यात. पदसिध्द शासकीय सदस्यांना यापुढे निविदा सूचनांच्या प्रती पाठविण्यात येअू नयेत.

<u>कार्यक्रम बाब क्र.३ अतिरिक्त ५० द.ल.लि. मीरा-भाअींदर पाणी पुरवठा योजना....</u>
<u>निविदा गट क्र.१ व गट क्र.२ च्या स्वीकृतीबाबत.</u>

मुख्य अभियंता,कोकण विभाग,ठाणे यांनी मीरा-भाअींदर पाणी पुरवठा योजनेच्या निविदा गट क्र.१ व २ बाबत संपूर्ण घटनाक्रम व सविस्तर माहिती प्राधिकरणापुढे सादर केली. सदर कार्यक्रम बाबीमध्ये असा अुल्लेख आहे की, निविदा शर्तीनुसार वरील २ निविदा गटांसाठी अेकाच ठेकेदाराचा देकार सर्वात कमी आला तर, त्यास त्याच्या अिच्छेचे कोणतेही अेकच काम मिळू शकेल. या मुद्यावर श्री.सुरेश पटवर्धन,सदस्य यांनी असा मुद्दा अुपस्थित केला की, अशा प्रकारची तरतूद कोणत्याही निविदेमध्ये नसते. ती या निविदेमध्येच का घालण्यात आली हे स्पष्ट करावे. यावर मुख्य अभियंता,कोकण विभाग,ठाणे यांनी असा खुलासा केला की. मीरा-भाअींदर पाणी पुरवठा योजनेची कामे ही अत्यंत महत्वाची असून, ती लवकरात-लवकर पूर्ण करावयाची असल्याने जर अेकाच ठेकेदारास संपूर्ण योजनेचे काम दिले गेले आणि त्यात नंतर काही अडचणी आल्या तर सदर योजना रखडून त्याचा विपरीत परिणाम होअील. हे टाळण्यासाठी वरीलप्रमाणे विशेष कलम सदर निविदेमध्ये घालण्यात आले होते.

याबाबतीत श्री.सुरेश पटवर्धन,सदस्य यांनी सुचविले की, अशा प्रकारच्या कुठल्याही वेगवेगळया तरतूदी निविदांमध्ये करावयाच्या असल्यास त्यास प्राधिकरणाची मान्यता घ्यावी .

त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. यांनी असा प्रस्ताव मांडला की,कार्यक्रम बाबीत सुचविल्याप्रमाणे दोन्ही काम मे.सुरेंद्र अिंजिनिअरींग कंपनी,मुंबअी यांस दयावयाची असल्यास निविदा गट क्र.२ चे काम मे.सुरेंद्र अिंजिनिअरींग कंपनी १७.२२% कमी दराने करावयास तयार असल्याने, निविदा गट क्र.१ चे काम देखील ते १४.२२% कमी दराने अेवजी,१७.२२% कमी दराने करावयास तयार असतील तर त्यात प्राधिकरणाचा सुमारे १ कोटी रुपयांचा फायदा असल्याने अशी विचारणा त्यांना करुन, त्यांचा होकार आल्यासच दोन्ही निविदा गट त्यांना देण्यात यावे. या शिवाय मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे सुचविले की, मे.सुरेंद्र अिंजिनिअरींग कंपनी यांच्याकडे किती कामे चालू आहेत, ती कामे आवश्यक त्या गतीने चालू आहेत ,किंवा कसे अथवा त्यापैकी काही कामे आधीच पूर्ण केली आहेत काय याबाबतची माहिती गोळा करण्यात येअून ती प्राधिकरणाच्या पुढील सभेत सादर करावी.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर खालील ठराव पारित करण्यात आला.

ठराव :-

अतिरिक्त ५० द.लि. मीरा-भाईंदर पाणी पुरवठा योजनेसाठी निविदा गट क्र.१ चे काम मे.सुरेंद्र अिंजिनिअरींग कंपनी १४.२२% कमी दरा अैवजी १७.२२% कमी दराने करण्यास तयार आहे काय याची विचारणा करण्यात यावी व त्यास त्यांच्याकडून होकार दिला गेल्यास निविदा गट क्र.१ व निविदा गट क्र.२ ही दोन्ही कामे १७.२२% कमी दराने स्वीकारण्यास प्राधिकरण मंजुरी देत आहे. या निविदेच्या स्वीकृत किंमती खालीलप्रमाणे राहतील:-

| निविदा क्र. | कंत्राटदार | निविदा रक्कम (रु) | देकार | स्विकृत किंमत (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | मे.सुरेंद्र अिंजि.कं., मुंबअी | ३६,८३,२७,७५५/- | १७.२२% कमी | ३०,४९,०१,७१६ /- |
| २ | मे.सुरेंद्र अिंजि.कं., मुंबअी | २४,७६,५७,८६२/- | १७.२२% कमी | २०,५०,११,१७८/- |

या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकरणाच्या सदस्य सचिव(तांत्रिक) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

कार्यक्रम बाब क्र.४:- वाढीव पनवेल पाणी पुरवठा टप्पा-३(अ) निविदा गट क्र.३

वाढीव पाणी पुरवठा योजना,टप्पा-३(अ)बाबत मुख्य अभियंता,कोकण विभाग,ठाणे, यांनी योजनांतर्गत कामे आणि निविदांची सविस्तर माहिती प्राधिकरणापुढे सादर केली.

रु.५.२५ कोटी खर्चांच्या या कामांसाठी अेकूण ६ नामवंत कंपन्यांना पूर्वअर्हता प्रमाणपत्र देण्यात आले होते. त्यापैकी ३ ठेकेदारांनी त्यांच्या निविदा सादर केल्या . या कामांसाठी सर्वांत कमी देकार मे.शेठ मसूरकर कन्स्टक्शन प्रा.लि.,ठाणे,यांनी १४.४०% जास्त (१९९६-९७ च्या दरसूचीवर आधारित) दिलेला होता. तो तदनंतर वाटाघाटी करुन, प्रथमत: १३.५०% जास्त (मुख्य अभियंता स्तरावर) आणि अंतिमत: १३.४१% जास्त (सदस्य सचिव स्तरावर वाटाघाटी करुन) केल्याचे मुख्य अभियंता यांनी सांगितले. सदर देकार जास्त असण्याची महत्वाची कारणे खालीलप्रमाणे असल्याचे निर्दशनास आणून देण्यात आले:-

१) पी.अेस्.सी.पाअिप्स्च्या गुरुत्वावाहिनीच्या पहिल्या ४ कि.मी.भागामध्ये (देहरंग धरणाजवळ) टेकडया असल्यामुळे पाअिप्स्ची वाहतूक मजुरांकरवी करावी लागेल. त्यामुळे निविदेतील दरांपेक्षा पाअिप्स्च्या वाहतुकीसाठीचा खर्च जास्त होणार आहे.

२) वितरण व्यवस्थेत गावात टाकावयाचे पाअिप्स्, गावातील अरुंद रस्त्याच्या बाजूने टाकावयाचे असल्यामुळे तसेच अस्तित्वात असलेल्या जुन्या पाअिप लाअिन्स्ना धोका होणार नाही अशा प्रकारे कामे करावी लागणार असल्याने यासाठी कुशल मजुरांचा वापर करावा लागणार आहे, ज्यासाठी जास्त दराने मजुरी द्यावी लागेल.

कंत्राटदाराच्या देकारांची तुलना ,चालू दरसूचीनुसार येणा-या किंमतीशी करिता सदर देकार ७.३२% जास्त असल्याने तो स्वीकृत करावा असा निर्णय घेण्यात आला व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव:-

''ठराव करण्यांत येतो की, रु.५,९५,२५,०५३/-(रु.पाच कोटी पंच्याण्णव लाख,पंचवीस हजार त्रेपन्न फक्त) किंमतीची मे.शेठ मसूरकर कन्स्ट्रक्शन प्रा.लि.,ठाणे यांची कमीत कमी किंमतीची (निविदेच्या अंदाजित किंमतीपेक्षा १३.४१% जास्त असलेली व सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार ७.३२% जास्त असलेली) निविदा वाजवी व तांत्रिकदृष्टया योग्य असल्याने ती स्वीकारण्यास म.जी.प्रा.,मान्यता देत आहे.

....४....

या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.''

**कार्यक्रम बाब क्र.५:-बानुरगड व इतर १३ गावांची ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना,तालुका-खानापूर, जि-सांगली**
**योजनेत समाविष्ट असलेली सर्व कामे करण्याबाबतच्या निविदा.**

मुख्य अभियंता,पुणे यांनी बानुरगड व इतर १३ गावांच्या ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील सर्व कामांसाठी असलेल्या निविदेची विषयांकित कार्यक्रम बाब सविस्तरपणे सभेपुढे मांडली. या कार्यक्रम बाबीवर चर्चा करताना, मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी अशी विचारणा केली की, या कामाच्या १९९६-९७ च्या दरसूचीनुसार येणारी किंमत आणि १९९७-९८ च्या दरसूचीनुसार येणारी किंमत बघता, त्यात सुमारे १०% ते १५% वाढ झालेली दिसते. अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी देखील याच मुद्यावर असे सुचविले की, १९९६-९७ च्या दरसूचीतील दर आणि १९९७-९८ च्या दरसूचीतील दर यामध्ये सर्वसाधारण भाववाढीचा विचार केला तर ८% ते १०% पेक्षा जास्त फरक असू नये. (वाढ असू नये) तथापि, असे दिसते की, ब-याच ठिकाणी १९९६-९७ च्या दरसूचीतील दर आणि १९९७-९८ च्या दरसूचीतील दर यामध्ये १५% पेक्षाही जास्त फरक आहे. हे दर या प्रमाणात का वाढले आहेत याचा सखोल अभ्यास करावा.

याच मुद्यांबाबत मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी असे सुचविले की, राज्यातील ६ प्रादेशिक मुख्य अभियंत्यांच्या स्तरावर ज्या दरसूच्या लागू केल्या आहेत, त्या दरसूचीमधील तफावत देखील बघावी, जेणेकरुन राज्यामध्ये वेगवेगळया विभागात लागू असलेले वेगवेगळे दर यामध्ये मोठया प्रमाणात फरक नसेल. त्यांनी अशीही विचारणा केली की, दरसूचीतील दर ठरविताना ते कोणता निकष लाऊन ठरविले जातात, याबाबत देखील सोदाहरण स्पष्ट करण्यात यावे. याबाबत मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी असे प्रतिपादन केले की, सदर कामांसाठी प्राप्त झालेला देकार हा मे.प्रतिभा कन्स्ट्रक्शन प्रा.लि.,कोल्हापूर, यांचा असून तो १९९६-९७ च्या दरापेक्षा १७.२२% जास्त दराचा आहे. ही वाढ सकृतदर्शनी जास्त वाटते तेंव्हा या कामासाठी कमीत-कमी देकार देणा-या ठेकेदारास निविदांतर्गत कामे ९.९५% जास्त दराने करण्यास तयार आहेत काय अशी विचारणा करावी, त्यास त्यांनी होकार दर्शविला तर ती निविदा स्वीकृत करण्यात यावी.

वरील चर्चेप्रमाणे खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :-

ठराव करण्यांत येतो की, ''बानुरगड प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या रु.८,३८,८७,०४३/- अंदाजित खर्चाच्या कामासाठी मे.प्रतिभा कन्स्ट्रक्शन प्रा.लि..कोल्हापूर यांनी दिलेला देकार हा १७.२२% जास्त वरुन कमी करुन ९.९५% जास्त दराने करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा स्वीकृत करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकरणाचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.''

**कार्यक्रम बाब क्र.६:-सावळज व इतर १० गावांची ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना,तालुका-तासगांव, जि-सांगली**
**योजनेत समाविष्ट असलेली सर्व कामे करण्याबाबतची निविदा**

मुख्य अभियंता,पुणे यांनी सावळज व इतर १० गावांच्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेतील सर्व कामांसाठी असलेंल्या निविदेची विषयांकित कार्यक्रम बाब सविस्तरपणे सभेपुढे मांडली.

या निविदा स्वीकृतीबाबत देखील प्राप्त झालेली मे.लक्ष्मी अंिजिनिअर्स,कोल्हापूर यांची निविदा १५.६५% जास्त दराची आहे व हा देकार देखील खूप जास्त वाटतो. तेंव्हा मे.लक्ष्मी अंिजिनिअर्स,कोल्हापूर यांना देखील ते त्यांचा देकार १५.६५ % वरुन कमी करुन, ९.९५ % जास्त करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा स्वीकृत करण्यात यावी असे ठरले आणि खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

ठराव करण्यांत येतो की, ''सावळज व इतर १० गावांची प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या रु.६,६३,७५,०२८/- अंदाजित खर्चांच्या कामासाठी मे.प्रतिभा कन्स्ट्रक्शन प्रा.लि.,कोल्हापूर यांनी दिलेला देकार हा १७.२२% जास्त वरुन कमी करुन ९.९५% जास्त दराने करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा स्वीकृत करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकरणाचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.''

**कार्यक्रम बाब क्र.७:-तानंग व इतर ६ गावांची प्रादेशिक ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना,तालुका-मिरज,जि-सांगली**
**योजनेत समाविष्ट असलेली सर्व कामे करण्याबाबतची निविदा**

मुख्य अभियंता,पुणे यांनी तानंग व इतर ६ गावांच्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेतील सर्व कामांसाठी असलेल्या निविदेची विषयांकित कार्यक्रम बाब सविस्तरपणे सभेपुढे मांडली.

या निविदा स्वीकृतीबाबत देखील प्राप्त झालेली मे.माने अँड कंपनी व विश्वकर्मा कंपनी प्रा.लि.,कोल्हापूर यांची निविदा १५.६५% जास्त दराची आहे व हा देकार देखील खूप जास्त वाटतो. तेंव्हा मे.माने अँड कंपनी व विश्वकर्मा कंपनी प्रा.लि.,कोल्हापूर यांना देखील ते त्यांचा देकार १५.६५ % वरुन कमी करुन, ९.९५ % जास्त करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा स्वीकृत करण्यात यावी असे ठरले आणि खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

ठराव करण्यांत येतो की, ''तानंग व इतर ६ गावांच्या प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या रु.६,६३,८८,०३२/- अंदाजित खर्चांच्या कामासाठी मे.माने अँड कंपनी व विश्वकर्मा कंपनी प्रा.लि.,कोल्हापूर यांनी दिलेला देकार हा १७.२२% जास्त वरुन कमी करुन ९.९५% जास्त दराने करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा स्वीकृत करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकरणाचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.''

**कार्यक्रम बाब क्र.८:-जाधववाडी व इतर ७ गावांची ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना,तालुका-खानापूर,जिल्हा-सांगली**
**योजनेत समाविष्ट असलेली सर्व कामे करण्याबाबतची निविदा**

मुख्य अभियंता,पुणे यांनी जाधववाडी इतर ७ गावांच्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेतील सर्व कामांसाठी असलेल्या निविदेची विषयांकित कार्यक्रम बाब सविस्तरपणे सभेपुढे मांडली.

या निविदा स्वीकृतीबाबत देखील प्राप्त झालेली मे.दास ऑफशोअर प्रा.लि. यांची निविदा १५.६५% जास्त दराची आहे व हा देकार देखील खूप जास्त वाटतो. तेंव्हा मे.दास ऑफशोअर प्रा.लि. यांना देखील ते त्यांचा देकार १५.६५ % वरुन कमी करुन, ९.९५ % जास्त वर करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा स्वीकृत करण्यात यावी असे ठरले आणि खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला .

**ठराव :-**

ठराव करण्यांत येतो की, ''जाधववाडी प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या रु.५,५२,९२,९९६ /- अंदाजित खर्चांच्या कामासाठी मे.दास ऑफशोअर प्रा.लि. यांनी दिलेला देकार हा १७.२२% जास्त वरुन कमी करुन ९.९५% जास्त दराने करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा स्वीकृत करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच

या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकरणाचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.''

**कार्यक्रम बाब क्र.९:-कारखेल व इतर ९ गावांची प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना,तालुका-बारामती, जिल्हा-पुणे**
**योजनेत समाविष्ट असलेली सर्व कामे करण्याबाबतची निविदा**

मुख्य अभियंता,पुणे यांनी कारखेल व इतर ९ गावांच्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेतील सर्व कामांसाठी असलेल्या निविदेची विषयांकित कार्यक्रम बाब सविस्तरपणे सभेपुढे मांडली.

कारखेल व इतर ९ गावांच्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेच्या १९९७-९८ च्या दरांवर आधारित रु.५,१४,१०,४६८/- किंमतीच्या योजनेसाठी मे.लार्क कन्स्ट्रक्शन, पनवेल यांनी ९.९% जास्त दराची म्हणजेच १९९७-९८ च्या दरसूचीनुसार मूल्यांकित रु.५,२६,९५,७३०/- या किंमतीवर ६.९२६% जास्त दराचा देकार स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला. या विषयाबाबत श्री.सुरेश पटवर्धन,सदस्य यांनी अशी विचारणा केली की, या कामासाठी मूळात दिलेला २८% जादा दराचा देकार कमी करुन, ९.९% कमी पर्यंत कसा खाली करण्यात आला, ही बाब विचार करण्यासारखी आहे. यावर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे सांगितले की, ब-याच वेळा काही ठराविक ठेकेदार अेखादी निविदा आपापसात वाटून घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतात आणि अशा वेळी प्रथमत: जास्तीत-जास्त दराने निविदेचा देकार देअून मग आवश्यकतेनुसार तो कमी करतात. अशा प्रकारे काही विशिष्ट निविदांबाबत कंत्राटदारांमध्ये होत असलेली ''साखळी'' तोडून,निविदा पुन्हा बोलविण्याचा निर्णय देखील घेण्यास हरकत नाही असे त्यांनी सुचविले. असे केल्यास कंत्राटदार साखळी करुन कामे जादा दराने करतात ही बाब प्राधिकरणाच्या लक्षात आलेली आहे हे त्यांना कळून अशा प्रकारच्या निविदेचा देकार देण्याच्या प्रवृत्तीस आळा बसू शकेल असे त्यांनी विदित केले.

**कार्यक्रम बाब क्र.१०:-ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतर्गत यांत्रिकी व विद्युतसंबंधी कामाच्या निविदा स्वतंत्रपणे मागविण्याबाबत (दि.१९ मार्च १९९८ रोजी संपन्न झालेल्या ७८ व्या सभेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सुधारित केलेल्या प्रस्तावासह)**

या कार्यक्रम बाबीव्दारे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतर्गत यांत्रिकी व विद्युत कामासंबंधीच्या निविदा स्वतंत्रपणे मागविण्याबाबत दि.१९ मार्च १९९८ रोजी संपन्न झालेल्या ७८ व्या सभेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आला. वरील बाब ही प्रस्तावित प्रकरणी मंत्री मंडळाच्या उप-समितीने घेतलेल्या निर्णयाच्या विरुध्द असल्याने सदर कार्यक्रम बाबीव्दारे प्रस्तावित करण्यात आल्याप्रमाणे कार्यवाही करावयाची झाल्यास त्यासाठी शासनाची मान्यता मिळणे आवश्यक आहे, असे अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सभेस सांगितले. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या सर्व कामांसाठी अेकत्रित अेकच निविदा बोलाविण्याचा निर्णय मंत्री मंडळाने का घेतला आहे, त्याची पार्श्वभूमी आणि शासनाची भूमिका देखील अपर मुख्य सचिव यांनी सभेस सांगितली. प्राप्त परिस्थितीत यांत्रिकी व विद्युत कामासंबंधीच्या निविदा वेगळया बोलवावयाच्या असल्यास त्यास मंत्री मंडळाची मान्यता मागण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव शासनाकडे सादर केला असून, त्यावर निर्णय होअीपर्यंत तरी सध्याच्या प्रचलित शासनाच्या निर्णयानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतर्गत सर्व कामांच्या अेकत्रित अेकच निविदा बोलाविण्यात याव्यात असे ठरविण्यात आले व त्याप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र.११:-केंद्र शासन पुरस्कृत मनुष्यबळ विकास कार्यक्रमाच्या संदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रशिक्षण केंद्राची वाढ.**

मुख्य अभियंता(बाहय अर्थसहाय्य) यांनी या कार्यक्रम बाबीतील महत्वाच्या बाबींची माहिती दिली. त्यांनी असे प्रतिपादीत केले की, राज्य शासनाने हाती घेतलेल्या महत्वाकांक्षी पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या संदर्भात प्रत्येक गावात तृणमूल स्तरावरील कर्मचा-यांसाठी प्रशिक्षण देणे आवश्यक असून, त्या संदर्भात नाशिक प्रशिक्षण केंद्रामध्ये केंद्र शासनाच्या कार्यक्रमानुसार मनुष्यबळ विकास कक्ष निर्माण करणे उचित राहील.

या कक्षासाठी विकत घ्यावयाच्या सामुग्रीचा तसेच या कक्षाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन व भत्त्यांच्या खर्चाचा अर्धा हिस्सा केंद्र शासन उचलणार असून, उरलेल्या अर्ध्या हिश्यांची तरतूद शासनास करावी लागणार आहे. हा खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरण करणार असेल तर हा प्रस्ताव मंजुर करण्यास काहीही अडचण नाही असा वित्त विभागाचे प्रधान सचिव यांनी अभिप्राय व्यक्त केला. तथापि, हा खर्च प्राधिकरण करु शकणार नसून राज्य शासनासच करावा लागेल असे स्पष्ट करण्यात आले. अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी असे मत व्यक्त केले की, ''पाणी पुरवठा'' शीर्षाखाली या कार्यक्रम बाबीसाठी जी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येते त्या तरतूदीतून हा खर्च केला गेल्यास निधी उपलब्धतेबाबत काही अडचण येऊ नये. प्रस्तावित ठराव मंजुर करण्यास हरकत नाही; पण मग त्यावर वित्त विभागास विचार करावा लागेल असे वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी स्पष्ट केले.

तदनंतर, असे ठरले की, कार्यक्रम बाबीत सूचित केल्याप्रमाणे नाशिक प्रशिक्षण केंद्रात मनुष्यबळ विकास कक्ष स्थापन करण्यात यावा व ''या प्रस्तावावर सविस्तर उहापोह करुन, येणा-या खर्चाच्या एकूण आकडेवारीसह पुन्हा: एक कार्यक्रम बाब प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत मान्यतेसाठी सादर करावयाची'' असा जो उल्लेख आहे त्याऐवजी, आजच्या बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे मनुष्यबळ विकास कक्षाच्या निर्मितीचा व तत्संबंधी पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत सदस्य सचिवांना अधिकार देण्यात यावेत.

ठराव :-

असा ठराव करण्यात येतो की, ''या कार्यक्रम बाबीत उल्लेख केल्याप्रमाणे केंद्र शासनाच्या धोरणानुसार राज्या-राज्यात मनुष्यबळ विकास कक्ष स्थापन करण्याच्या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नाशिक येथील प्रशिक्षण केंद्रात, मुख्य अभियंता दर्जाचे कार्यकारी संचालक असे एक पद व अधीक्षक अभियंता दर्जाचे संचालक वा उप संचालक, अशी २ पदे यासह, केंद्र शासनाने मान्य केलेल्या प्रस्तावानुसार मनुष्यबळ विकास कक्ष स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या संदर्भात बैठकित चर्चा झाल्याप्रमाणे सविस्तर उहापोह करुन, मनुष्यबळ विकास कक्षाच्या निर्मितीचा व तत्संबंधी पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव त्यासाठी येणा-या खर्चाच्या आकडेवारीसह शासनास सादर करण्यासाठी सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

कार्यक्रम बाब क्र.१२:- सिमेंटचा पुरवठा व विभागवार वितरण व्यवस्था

वरील कार्यक्रम बाबीबाबत अधीक्षक अभियंता(मुख्यालय) यांनी सभेस असे सांगितले की,पाटबंधारे खात्याने केलेल्या दर करारातील दर नुकतेच कमी करण्यात आले असून, पूर्वीपेक्षाही कमी दराने म्हणजेच रु. १६५० दर टनास या दराने, सध्या सिमेंट पाटबंधारे खात्याकडून विकत घेण्यात येते व त्याचप्रमाणे ते प्राधिकरणाने देखील विकत घ्यावे असे प्रस्तावित करण्यात येत आहे. याबाबत मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे सांगितले की, प्रत्यक्षात बाजारात अुपलब्ध असलेले सिमेंटचे दर देखील कमी झाले असल्याने बाजारातील अुपलब्ध दर आणि पाटबंधारे खात्याने कमी केलेले दर यांची तुलना करणे देखील आवश्यक आहे काय याचाही विचार करावा.

सिमेंट पुरवठा व विभागवार वितरण व्यवस्था या संदर्भात कार्यक्रम बाब क्र.१२ नुसार सादर करण्यात आलेल्या प्रस्तावर चर्चा करताना मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे सुचविले की , माणिकगड, लार्सन अँड टुब्रो कंपनी सारख्या ज्या नवीन कंपन्यांकडून सिमेंट घेणे प्रस्तावित आहे, त्या कंपन्याना पत्रे लिहून ते पाटबंधारे खात्याने केलेल्या दर कराराच्या दरानुसार सिमेंट देण्यास तयार आहेत काय याची विचारणा करण्यात यावी आणि त्यांच्याकडून ज्या प्रमाणे पत्रे येतील त्याप्रमाणे पुढील सभेत आवश्यक ती कार्यक्रम बाब सादर करण्यात यावी.

याच विषयावर चर्चा करीत असताना, मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी कार्यक्रम बाब क्र.३,४ व ९ यानुसार स्वीकृत निविदांबाबत आत्ताच कार्यादेश दिले(Work Order ) तरी लवकरच पावसाळा सुरु होणार असल्याने पुढील ४ महिने काहीही कामे न करता देखील संबंधित ठेकेदारांना या कामासाठी भाववाढ देय होअील.तेंव्हा या कामाचे कार्यादेश आत्ताच देणे आवश्यक आहे काय याचाही विचार करावा. याबाबत असे स्पष्ट करण्यात आले की, कोणत्याही निविदेच्या देकाराची ग्राहयता मुदत ही निविदा सूचना देतानाच ठरविली असते व ती संपायच्या आधी निविदा स्वीकृत करुन कार्यादेश देणे आवश्यक असते. त्यामुळे मा.राज्यमंत्री.पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सुचविल्याप्रमाणे अेखादी निविदा स्वीकृत करण्याचा निर्णय झाल्यानंतर संबंधित ठेकेदारांना

कार्यादेश देण्याचे थांबविणे योग्य होणार नाही. याच अनुषंगाने मुख्य अभियंता, कोकण विभाग, ठाणे यांनी असे सांगितले की, शासनातील पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे देखील अशा प्रकारचे कार्यादेश दिले जातात व कार्यादेश दिलेल्या दिवसापासून शासन नियमानुसार जी भाववाढ (अेस्कलेशन) देय होते ते देणे निविदेतील तरतूदीनुसार बंधनकारक असते.

**कार्यक्रम बाब क्र.१३:- धुळे शहर पाणी पुरवठा योजनेवर वरीष्ठ पदावर तात्पुरत्या केलेल्या कामाचा मोबदला मिळणेची पाणी पुरवठा कर्मचारी संघटनेच्या मागणीबाबत....**

सदर कार्यक्रम बाबीची संपूर्ण माहिती मुख्य अभियंता,नाशिक यांनी सभेस सांगितली. याबाबत अशी विचारणा करण्यात आली की, धुळे पाणी पुरवठा योजना ही धुळे नगरपालिकेने त्यांच्या ताब्यात घेतली आहे किंवा कसे याबाबत खुलासा करावा. या बाबत मुख्य अभियंता,नाशिक यांनी असे सांगितले की, प्रस्तावित प्रकरणी अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांच्याकेडे नुकत्याच झालेल्या सभेत ठरल्यानुसार दि.६/६/९८ रोजी त्रिपक्षीय करार जिल्हाधिकारी,धुळे यांच्या कार्यालयात करावयाचे ठरले आहे. असा करार झाल्यास सदर योजना दि.६/६/९८ रोजी नगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात येअील.

वरील बाब सांगितल्यानंतर मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी असे सुचविले की, दि.६/६/९८ रोजी जर सदर पाणी पुरवठा योजना हस्तांतरीत करण्यात आली तरच सदर कार्यक्रम बाबीव्दारे प्रस्तावित करण्यात आल्याप्रमाणे ज्या कर्मचा-यांनी एप्रिल १९९८ पावेतो धुळे (तापी) पाणी पुरवठा योजनेवर प्रत्यक्ष वरिष्ठ पदावर काम केले आहे त्यांना संबंधित कालावधीसाठी वरिष्ठ पदाच्या मूळ वेतनाच्या १०% मोबदला देणेबाबत विचार करण्यात यावा. दि.६/६/९८ रोजी सदर योजना हस्तांतरीत झाली नाही तर मात्र प्रस्तावित प्रकरणी विचार करण्यात येअू नये.

**आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.१:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात कनिष्ठ अभियंता पदासाठी मर्यादित स्वरुपाच्या स्पर्धात्मक परिक्षा घेऊन कंत्राटपध्दतीने नेमणूक करणे.**

मुख्य अभियंता(बा.अ).यांनी या कार्यक्रम बाबीतील महत्वांच्या बाबींची कल्पना दिली. कनिष्ठ अभियंत्यांची जी पदे कंत्राट पध्दतीवर भरण्यात यावयाची आहेत, ती निवड मंडळामार्फत भरली जाणार आहेत काय अशी विचारणा करण्यात आली. त्यावर असा खुलासा करण्यात आला की, कार्यक्रम बाबीच्या १ ल्या परिच्छेदांत म्हटल्याप्रमाणे शासकीय निर्णयानुसार भूकंप क्षेत्रातील कामांवर नेमलेल्या व तेथील कामे पूर्ण आल्याने अतिरिक्त ठरलेले कनिष्ठ अभियंते, पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/तांत्रिक सहाय्यक म्हणून काम करणारे पदविकाधारक, तसेच प्राधिकरणामध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून प्रशिक्षण पूर्ण केलेले पदविकाधारक व पदवीधारक यांच्यासाठी मर्यादित स्वरुपाची स्पर्धात्मक परिक्षा घेऊन कंत्राट पध्दतीने नेमण्याचा प्रस्ताव आहे.

सध्या जरी हे कनिष्ठ अभियंते कंत्राट पध्दतीने नेमण्याचे प्रस्तावित असले तरी भविष्यात हे सर्व अभियंते आपणास नोकरीत कायम ठेवावे अशी मागणी केली जाण्याची शक्यता आहे, या मुद्यांवर मुख्य अभियंता(बा.अ) यांनी असे स्पष्ट केले की, स्पर्धात्मक परिक्षांच्या संदर्भात वृत्तपत्रात जी जाहिरात दिली आहे त्यामध्ये ''कंत्राटपध्दतीवर नेमणूक करण्यात आल्यानंतर सेवा समाप्त केल्यावर, आपणास प्राधिकरणाच्या सेवेत कायम करावे अशी मागणी करता येणार नाही, हे मान्य असणा-यांनीच या परिक्षेसाठी अर्ज भरावा'' असा उल्लेख केला जाणार असून, भविष्यात प्रत्यक्षात जे काही घडेल त्यानुसार तेंव्हा योग्य ती कार्यवाही करावी लागेल.

कनिष्ठ अभियंत्यांची ही पदे वर्षानुवर्षे रिकामी असतील तर त्यांची आवश्यकता आहे काय आणि शासनाच्या नियमानुसार अशी पदे ६ महिन्याहून जास्त काळ रिकामी असतील तर ती व्यपगत झाली नसणार नाही काय असा मुद्या वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी उपस्थित केला. त्यावर असे स्पष्ट करण्यात आले की, सर्वसाधारणत: कनिष्ठ अभियंत्यांची पदे रिक्त होतात तेंव्हा त्या-त्या कार्यालयातील इतर कनिष्ठ अभियंत्यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्याची प्रथा असते; त्यामुळे ही पदे व्यपगत होण्याचा प्रश्न येणार नाही. तथापि, ही बाब तपासून घ्यावी असे ठरले. अखेरीस मर्यादित स्वरुपाची स्पर्धात्मक परीक्षा सांगलीच्या वालचंद अभियांत्रिकी विद्यालयाकडून घेतली जाऊन, त्याव्दारे कनिष्ठ अभियंत्यांची ही पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला व पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव :-

ठराव करण्यात येतो की, स्पर्धात्मक परिक्षा घेऊन प्राधिकरणामध्ये कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंत्यांची पदे भरण्याबाबत कार्यक्रम बाबीमध्ये उल्लेख केलेल्या बाबींची नोंद घेण्यात आली.

अशा रीतीने सांगलीच्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयावर ही परिक्षा घेण्याची जबाबदारी सोपविण्यास मान्यता देण्यात येत आहे, व त्यासंबंधी कार्यक्रम बाबीत उल्लेख केल्याप्रमाणे त्या संस्थेस फी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

असाही ठराव करण्यात येतो की, परिक्षा घेण्याबाबतचा कार्यक्रम, त्यासाठीच्या अटी, तसेच परिक्षा घेण्याचा खर्च प्राधिकरणाने करावा,यासह ज्या अनुषंगिक बाबींचा उल्लेख कार्यक्रम बाबीमध्ये केलेला आहे, त्या सर्व बाबींना प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.

**आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.२:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांत दक्षता पथकाची निर्मिती करणे तसेच दैनंदिन तत्वावर योजनांची त्रयस्थ यंत्रणांकडून पहाणी करुन घेणे.**

मुख्य अभियंता,(बाहय अर्थसहाय्य) यांनी असे विषद केले की, २० मे १९९८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत वरील विषयावर चर्चा होऊन त्या चर्चेत जे अभिप्राय व्यक्त करण्यात आले होते त्यानुसार व तद्नंतर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे निवृत्त प्रधान सचिव श्री.एन.व्ही.मेराणी यांच्याशी जी चर्चा केली, त्या अनुषंगाने ही कार्यक्रम बाब मांडण्यात आली आहे.

गुणवत्ता नियंत्रणाच्या संदर्भात मांडण्यात आलेल्या प्रस्तावांतील पृष्ठ क्र.२ वर ''ऊ'' या उपपरिच्छेदामध्ये ''गुणवत्ता नियंत्रण'' या शब्दाचा अंतर्भाव करावा; तसेच निविदा स्वीकारणे असा जो उल्लेख आहे त्याबाबतीतही स्पष्टकरणाची आवश्यकता आहे असे मा.उपाध्यक्ष यांनी सुचविले. शिवाय भांडार सामुग्रीची तपासणी करावी असेही त्यांनी स्पष्ट केले. मा.उपाध्यक्षांनी सुचविल्याप्रमाणे कामाच्या स्वरुपामध्ये गुणवत्ता नियंत्रण व भांडार सामुग्रीची तपासणी यांचा समावेश केला जाईल असे सांगण्यात आले.

तसेच या उपपरिच्छेदात ''निविदा स्वीकरण्याच्या संदर्भात'' पथकाने जी तपासणी करावयाची आहे त्याबाबत असे ठरविण्यात आले की, प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांच्या कार्यालयात तसेच प्राधिकरणाच्या बैठकीत ज्या निविदा स्वीकारल्या जातात त्या वगळता, क्षेत्रीय स्तरावर स्वीकारण्यात आलेल्या निविदा नियमानुसार मागविण्यात आल्या होत्या का, त्यांची छाननी कशी करण्यात आली व त्या निविदा नियमानुसार स्वीकारण्यात आल्या का, याची तपासणी या गुणवत्ता नियंत्रण पथकाकडून केली जावी.

उपपरिच्छेद ''अे'' मध्ये, गुणवत्ता नियंत्रण पथकाच्या अधिका-यांनी पाहणी केल्यावर त्यांनी त्याबाबतचा अहवाल प्राधिकरणाच्या अधिका-यांना ''त्वरित'' पाठवावा असा जो उल्लेख आहे, त्याबाबत कालमर्यादा ठरवून देणे आवश्यक आहे असे मा.अध्यक्षांनी सुचविले. त्यानुसार ''पाहणीनंतर ८ दिवसाचे आत'' हा अहवाल गुणवत्ता नियंत्रण पथकाच्या अधिका-यांनी पाठवावा असेही ठरले. या अहवालाची प्रत केवळ प्राधिकरणाच्या अधिका-यांना न पाठविता, मंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनाही पाठविणे आवश्यक आहे, असा मा.उपाध्यक्ष यांनी मुद्दा मांडला व तो स्वीकारुन त्यानुसार कार्यवाही करण्याचे ठरले.

प्राधिकरणामध्ये गुणवत्ता नियंत्रण कक्ष अस्तित्वात आहे व त्यांच्याकडून या संदर्भात कार्यवाही होत आहे याबाबत प्राधिकरणाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना काही कल्पना नाही असा मा.उपाध्यक्षांनी अभिप्राय व्यक्त केला. त्यांनी अशी सूचना केली की, या गुणवत्ता नियंत्रण पथकाने आजवर काय कार्यवाही केली, त्यांच्या पहाणीमध्ये त्यांना काय आढळून आले व त्यावर काय कारवाई करण्यात आली याबाबतची माहिती देणारी एक कार्यक्रम बाब प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावी.

दक्षतेच्या संदर्भातील बाबी हाताळणे व त्रयस्थ यंत्रणेकडून योजनांची पाहणी करणे संदर्भात यंत्रणा ठरवून त्यांच्यावर काम सोपविणे, याबाबतचा निर्णय घेण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या

अध्यक्षतेखाली जी समिति नेमण्याचा प्रस्ताव आहे ती समिती कायम स्वरुपी असणार आहे काय, अशी वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी विचारणा केली. त्यावर असा खुलासा करण्यात आला की, ही समिती कायम स्वरुपी राहील, तथापि सदस्यांची मुदत ठरवावी लागेल. त्याबाबत करण्यात आलेला सूचनांचा विचार करण्यात येऊन अखेरीस या समितीच्या अशासकीय सदस्यांची मुदत १ वर्ष असावी असे ठरले.

या समितीवरील सदस्यांची जी नावे प्रस्तावित करण्यात आली आहेत ते सर्व निवृत्त असून, त्यांची वये ६० वर्षे, वा त्याहून जास्त असण्याची शक्यता आहे. तेंव्हा हे सदस्य प्रत्यक्षात या समितीच्या कामकाजात भाग घेऊ शकतील काय असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तसेच या सदस्यांकडे विचारणा करण्यात आली आहे काय असाही मुद्दा उपस्थित करण्यात आला. संबंधित व्यक्तींशी या संदर्भात संपर्क साधावयाचे ठरले.

या सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल व एखादया व्यक्तिने सदस्य म्हणून काम करण्यास असमर्थता व्यक्त केल्यास कार्यक्रम बाबीत उल्लेख केल्याप्रमाणे अपर मुख्य सचिवांशी विचारविनिमय करुन, दुस-या एखादया व्यक्तिची सदस्य म्हणून निवड प्रस्तावित करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले व ते मान्य झाले.

मा.उपाध्यक्षांनी असा मुद्दा मांडला की, दक्षतेच्या संदर्भात व प्राधिकरणाकडे आलेल्या तक्रारींच्या कार्यवाही संदर्भात त्यांनी चर्चेमध्ये यापूर्वी अनेक वेळी अशा सूचना केल्या होत्या की, दक्षता पथकाबरोबर प्रत्येक महसूल विभागासाठी एक भरारी पथक असावे व त्यांनी त्या-त्या ठिकाणी भेटी देऊन, पहाणी करुन अहवाल सादर करावा व त्यावर पुढील कारवाई केली जावी. या कार्यक्रम बाबीमध्ये दक्षतेच्या संदर्भात जी समिती नेमण्याचा प्रस्ताव आहे, ती समिती कितपत प्रभावी ठरु शकेल याची आपणास खात्री वाटत नाही असे नमूद करुन त्यांनी त्याऐवजी अशा प्रकारचे हे जबाबदारीचे काम पाहण्यासाठी एक नवीन मुख्य अभियंत्यांचे पद निर्माण करण्यात यावे व त्यांच्यावर हे काम सोपवावे ही सूचना केली.

समिति असो वा मा.राज्यमंत्री महोदयांनी सूचना केल्याप्रमाणे मुख्य अभियंतांचे पद निर्माण करणे असो, या दक्षता पथकाकडून नेमके काय काम केले जाईल यावर बरेचसे अवलंबून राहील असे मत वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी व्यक्त केले. त्यांच्या अभिप्रायाचा रोख असा होता की, दक्षता पथकाने जास्त प्रभावीपणे व अधिक प्रमाणात कामगिरी केली तर कामाच्या गुणवत्तेत निश्चित सुधारणा होईल. तथापि, या पथकाच्या अधिका-यांनी त्यांना दिलेल्या अधिकाराचा गैरवापर केल्यास नवीनच काही प्रश्न निर्माण होतील. तेंव्हा मुख्य अभियंत्यांचे पद निर्माण केले तरी कार्यक्रम बाबीत सूचना केल्याप्रमाणे समिति असणेही आवश्यक राहील. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव या समितीचे अध्यक्ष असल्याने ते या एकूण परिस्थितीवर थोडे तरी स्वतंत्रपणे लक्ष ठेऊ शकतील. त्यावर मा.उपाध्यक्ष यांनी अशी सूचना केली की, अशी समिती असण्यास हरकत नाही व अपर मुख्य सचिवांनी ६ ही महसूल विभागातील दक्षता संदर्भातील कामगिरीवर लक्ष ठेऊन विभागवार नियंत्रण ठेवावे.

तसेच या कार्यक्रम बाबीमध्ये गुणवत्ता नियंत्रण पथकाबाबत जो उल्लेख आहे, या संदर्भात मा.मंत्री महोदयांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, प्राधिकरणामध्ये गुणवत्ता नियंत्रण पथक अस्तित्वात आहे व त्यांच्याकडून ही कार्यवाही होत आहे अशी जर परिस्थिती असेल तर, भूकंपग्रस्त क्षेत्रामध्ये जिथे पाणी पुरवठा योजनांची कामे झाली तिथे मोठया व गंभीर स्वरुपाच्या तक्रारी येण्याची वेळ का आली, याचा विचार होणे जरुर आहे. परिस्थितीचे गांभीर्य पहाता,केवळ अपर मुख्य सचिव व सदस्य सचिवांनाच नव्हेतर मा.राज्यमंत्री महोदयांनी व मंत्री महोदय यांना या ठिकाणी भेटी देऊन लक्ष घालावे लागले. हे योग्य नाही. तेंव्हा दक्षता पथकाची आवश्यकता आहे हे स्पष्ट होते.

मा.राज्यमंत्री महोदयांनी असे ध्यानांत आणून दिले की, या बाबींवर झालेल्या चर्चेत अनेक वेळा त्यांनी प्रत्येक महसूल विभागासाठी एक स्वतंत्र भरारी पथक असावे यावर भर दिला होता. तथापि, त्याची काहीही दखल या कार्यक्रम बाबीत घेण्यात आली नाही, त्यासाठी काही पदांच्या निर्मितीच्या प्रस्तावही केलेला नाही.

वरील चर्चेनंतर सर्वांनुमते असे ठरले की, आजच्या चर्चेमध्ये ज्या काही सूचना करण्यात आल्या त्या सर्वांची दखल घेऊन ही कार्यक्रम बाब नवीन स्वरुपात पुढील बैठकीत मांडण्यात यावी.

आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र. ३

प्राधिकरणाच्या मागच्या सभेत ठरल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा दरमहा प्राधिकरणाच्या सभेत सादर करावयाचे ठरले होते. त्यानुसार ही कार्यक्रम बाब वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी सादर केली. तथापि, सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) हे प्रशिक्षणासाठी परदेश दौ-यावर गेले असल्यामुळे या कार्यक्रम बाबीवर चर्चा करण्यात येअू नये असे ठरले व प्राधिकरणाच्या पुढील सभेत याबाबतची कार्यक्रम बाब योग्य त्या माहितीसह सादर करण्यात यावी असे आदेश मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी दिले.

बैठक संपण्यापूर्वी मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी खालील दोन महत्वाच्या गोष्टींची घोषणा केली .

१) प्राधिकरणाने तालुका स्तरावरील सर्व योजनांची अेकत्रित अेकच निविदा बोलाविण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे प्राप्त होणा-या निविदांची किंमत ही रु.१० कोटी पेक्षाही जास्त असण्याची शक्यता असल्याने व प्राधिकरणाची सभा दरमहा होतेच असे नसल्याने अशा निविदांच्या प्रकरणी निर्णय अवाजवी प्रलंबित राहू नये म्हणून खालील सदस्यांच्या निविदा समितीची स्थापना केल्याचे मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी सभेस सांगितले.

१) मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष
३) अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
४) श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
५) सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
६) सदस्य सचिव(तांत्रिक),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
७) ज्या विभागीय स्तरावरील निविदा स्वीकृत करावयाचे प्रस्तावित आहे,त्या विभागाचे संबंधित मुख्य अभियंता.

सदर निविदा समितीच्या बैठकीसाठी आवश्यकता असल्यास प्राधिकरणाच्या वित्त शाखेतील अथवा तांत्रिक शाखेतील आवश्यक त्या अधिका-यांना बोलाविण्यात यावे असेही ठरले.

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी असेही सांगितले की, निविदा समितीची बैठक दर मंगळवारी संध्याकाळी ५.०० वाजता त्यांच्या दालनात यापुढे होत राहील आणि त्यावेळी जे-जे निविदा स्वीकृतीचे प्रस्ताव प्राधिकरण स्तरावर विचाराधीन असतील त्यावर विचार करुन निर्णय घेण्यात येअील. निविदा समितीने घेतलेल्या निर्णयानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी करावयाची असून, निविदा समितीने घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्याचे काम प्राधिकरणाच्या पुढील सभेत होण्यासाठी आवश्यक ती कार्यक्रम बाब सदस्य सचिव(तांत्रिक)/संबंधित मुख्य अभियंता यांनी सादर करावी, असेही मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सांगितले.

२) मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाकडे सध्या स्थापत्य वर्गांमध्ये वर्ग १ ते ७ मध्ये स्थापत्य ठेकेदारांची नोंद करण्यात येते तर वर्ग ''अ'' ते ''ड'' (A to D ) मध्ये यांत्रिकी व विद्युत ठेकेदारांची नोंद करण्यात येते. प्रचलित नियमानुसार वर्ग-२ मधील ठेकेदार रु.३ कोटी पर्यंतच्या कामासाठी त्यांचे देकार देअू शकतात. तर वर्ग-१ मधील ठेकेदार अमर्याद किंमतीपर्यंतच्या निविदांसाठी देकार देअू शकतात. वर्ग-१ व वर्ग-२ मधील नोंदणीकृत ठेकेदार ज्या किंमतीच्या कामांच्या निविदा भरु शकतात त्यामध्ये खूप मोठी तफावत असल्याने आणि वाढीव किंमतीचा विचार करता, वर्ग-१ व वर्ग-२ यामध्ये दोन अतिरिक्त वर्गांचा समावेश करणे आवश्यक आहे. तसेच वर्ग-१ ते वर्ग-७ पर्यंतचे कंत्राटदार सध्या ज्या किंमतीपर्यंतच्या निविदांसाठी देकार देअू शकतात त्यामध्ये देखील वाढ करणे आवश्यक असल्याचे मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सांगितले.

याबाबत असा खुलासा करण्यात आला की, शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने देखील वरील बार्बीचा विचार करुन, सार्वजनिक बांधकाम खात्याकडे ज्या ठेकेदारांची नोंदणी झालेली आहे, त्यांच्या निविदांचे देकार सादर करण्याच्या किंमतीमध्ये देखील नुकतीच वाढ केलेली आहे. यावर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता

९५



विभाग,यांनी असे सुचविले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या बदलाचा विचार करुन, प्राधिकरणाच्य ठेकेदारांच्या नोंदणीच्या वर्गामध्ये देखील आवश्यक ते बदल करणारी कार्यक्रम बाब प्राधिकरणाच्या पुढील सभेत साद करण्यात यावी.

त्यानंतर सर्व अुपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाल्याचे मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी जाहीर केले.

80-mk